# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, जालना</u>

## <u>निविदा / दरपत्रक</u>

वित्तीय वर्ष 2025–26 या वर्षातील आयकराची गणना करुन फॉर्म नंबर 16 हे ऑनलाईन तयार करुन घेणे, तसेच जी.एस.टी. चे मासीक विवरणे ऑनलाईन अपलोड करणे या करिता जाणकार असणा–या तज्ञाकडून (सी.ए.) जिल्हा न्यायालय, जालना व जिल्हा न्यायालयाच्या अंतर्गत येणा–या सर्व न्यायालयातील न्यायीक अधिकारी व कर्मचारी असे अंदाजे 450 जणांची नियमानुसार आयकराची गणना करुन ऑनलाईन 16 नंबर देणे आवश्यक असल्यामुळे, तसेच चालू वित्तीय वर्ष सन 2025–2026 चे प्रत्येक तिमाहीची ऑनलाईन माहिती (ई–टिडिएस) (सॅलरी 24Q) व वेतना व्यतिरिक्त (नॉन सॅलरी 26Q) इत्यादीची माहिती भरुन ती आयकर विभागाने व जी.एस.टी. विभागाने निर्देशीत केलेल्या वेळेत सदरील निविदा मागविण्यात येत आहेत. सदरील कामे करणेसाठी वार्षिक फिस किती आकारणार या बाबतचे आपले दरपत्रक / निविदा या कार्यालयास **दिनांक 21/04/2025** रोजी **सायंकाळी 05.00** वाजेपर्यंत सादर करावे. या कामासाठी ज्यांचे वार्षिक दर सर्वात कमी असतील त्यांना प्राधिकृत करण्यांत येईल.

सोबत दिलेल्या नियम, अटी व शर्तीनुसार सदरील कामाबाबतची फिस्चे दरपत्रक / निविदा सिलबंद पाकीटामध्ये बंद करावे व त्या पाकीटावर **<u>"कर सल्लागार नेमणुकीसाठीचे दरपत्रक"</u>** असे नमुद करुन प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या नावाने या कार्यालयास **दिनांक 21/04/2025** रोजी **सायंकाळी 05.00** वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक/निविदा स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

आदेशान्वये,

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जालना.

**प्रबंधक**
**जिल्हा व सत्र न्यायालय**
**जालना**

# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

**आर्थिक वित्तीय वर्ष सन 2025–2026 करीता कर सल्लागार म्हणून नेमणुक करण्यासाठी खालील नियम, अटी व शर्ती लागू राहतील.**

01) जिल्हा न्यायालय, जालना व जिल्हा न्यायालयाच्या अंतर्गत येणा–या सर्व न्यायालयातील न्यायीक अधिकारी व कर्मचारी असे अंदाजे 450 जणांची नियमानुसार आयकराची गणना करुन ऑनलाईन 16 नंबर देणे. तसेच चालू वित्तीय वर्ष सन 2025–2026 चे प्रत्येक तिमाहीची ऑनलाईन माहिती (ई–टिडिएस) (सॅलरी 24Q) व वेतना व्यतिरिक्त (नॉन सॅलरी 26Q) इत्यादीची माहिती भरुन ती आयकर विभागाने व जी.एस.टी. विभागाने निर्देशीत केलेल्या वेळेत भरणेसाठी सदरील निविदा मागविण्यात येत आहेत.

02) प्रत्येक अधिकृत सीए/कर सल्लागारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी.

03) या कार्यालयाच्या पूर्ण गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येईल.

04) निविदाकाराने अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक बंद पाकिटात सादर करणे बंधनकारक राहील.

05) दरपत्रकामध्ये इतर शुल्क / चार्जस् वगैरे यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

06) दरपत्रक सादर करणाऱ्या अधिकृत कर सल्लागाराचा या कार्यालया बरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

07) दरपत्रके सादर करतांना सिलबंद पाकीटावर **"कर सल्लागार नेमणुकीसाठीचे दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करावा. सदरील सिलबंद दरपत्रक हे दिनांक 21/04/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

08) सदरील दरपत्रके पाठवितांना ती **"मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना"** यांचे नांवे पाठविण्यात यावी.

09) प्राप्त झालेली सिलबंद दरपत्रके ही जिल्हा न्यायालय, जालना "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष जिल्हा न्यायाधीश–1, जालना यांचे निजीकक्षात दिनांक 23/04/2025 रोजी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी समिती पुढे उघडली जातील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुस–या दिवशी प्राप्त दरपत्रके समिती पुढे उघडली जातील.

10) सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना हे राखून ठेवत आहे.

आदेशान्वये,

07/4/25

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

दिनांक: 07/04/2025

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

E:\rbs2022\CA 25-26\CA LETTER 2025-26.odt 3